

दैनिक
दिव्य मातृछाया

रविवार ०८ नोव्हेंबर २०२६

बुलडाणा

वर्ष - सहावे अंक - ११६ पाने - ४ RNI.NO.MAHMAR/2022/87711 https://www.maturchhaya.in मुख्य संपादक - सादिक कुरेशी 9420647272 कार्यकारी संपादक - आसिफ गवळी 9767681555

थोडक्यात



कमी वेगातील थारला ट्रकची धडक:एकाचा मृत्यू

दै. दिव्य मातृछाया

अमरावती : समृद्धी महामार्गावर सहसा भरधाव वेगामुळे अपघात घडत असल्याच्या घटना समोर येतात. मात्र, शुक्रवारी (दि.६) पहाटे धामणगाव रेल्वे एक्झिट पॉईंटजवळ एक वेगळाच अपघात घडला. धामणगाव येथे जाणारा एक्झिट पॉईंट शोधताना रस्ता चुकला. त्यामुळे 'थार' जीपचा वेग कमी झाला, त्याचवेळी मागून येणाऱ्या भरधाव ट्रकने थारला जोरदार धडक दिली. या अपघातात थारमधील एका ४० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून दोघे जण जखमी झाले आहेत. अशोक लक्ष्मण अंभोरे (४०, रा. तरोडा, ता. दारव्हा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. तर आशिष दुर्गाप्रसाद पांडे आणि अक्षय सुधाकर ठाकरे (दोघे रा. दारव्हा, जि. यवतमाळ) हे या अपघातात जखमी झाले आहेत. अशोक, आशिष आणि अक्षय हे तिघेही 'थार' वाहनाने चंद्रपूरहून यवतमाळकडे जाण्यासाठी निघाले होते. शुक्रवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास ते समृद्धी महामार्गाने धामणगाव रेल्वे परिसरात पोहोचले. यवतमाळला जाण्यासाठी त्यांना धामणगाव येथील एक्झिट पॉईंटवरून खाली उतरायचे होते. मात्र, अंधार आणि एक्झिट मार्गाचा अंदाज न आल्याने त्यांच्याकडून एक्झिट पॉईंट हुकला आणि थार काही अंतर पुढे निघून गेली. योग्य मार्ग शोधण्यासाठी चालकाने थारचा वेग अतिशय मंद केला. त्याच वेळी नागपूरकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एका भरधाव ट्रकने थारला मागून जोरदार धडक दिली.



चोरट्यांचा धुमाकूळ : लाखोंचा ऐवज लंपास

दै. दिव्य मातृछाया

नेवासे फाटा : नेवासा तालुक्यातील मुळाथडी परिसरातील पानेगावात गुरुवारी मध्यरात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालत लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला. मुळाथडी परिसरात कायमस्वरूपी पोलीस चौकी उभारण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. गुरुवारी पहाटे चोरट्यांनी शिरेगाव रस्त्यापासून दगडफेक करत दहशत निर्माण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मुळा कारखान्याचे संचालक संजय जंगले यांच्या वस्तीवरील बंगल्याचे गेट तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. घरातील रोख रक्कम तसेच कपडे असा ऐवज चोरट्यांनी लंपास केला तेथून पुढे मनोहर भागवत, बाबासाहेब संपत जंगले, काबू जंगले यांच्या घरातूनही रोख रक्कमेसह शेळी चोरून नेल्याचे समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नवगिरे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू, स्थानिक गुन्हे शाखेचे जिल्हाप्रमुख संतोष मुटकुळे यांच्याशी संपर्क साधून सोनई पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांना तपासाच्या सूचना देण्यास सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसोबत साजरी केली दिवाळी

लोहारी सावंगा येथे शेतक-यांनी संवाद व मुक्काम; शेतक-यांवर ओढवलेले संकट दूर करण्याचा विश्वास

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

नागपूर : राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. शेतकऱ्यांना धीर देण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी शेतकऱ्यांसोबत दिवाळी सण साजरा करण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली होती. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी आज नागपूर जिल्ह्यातील लोहारी सावंगा (ता. नरखेड) येथे शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली. शेतकऱ्यांनी संवाद साधतांना दुष्काळाच्या संकटातून बाहेर पडू, असा विश्वास व्यक्त केला. गावातच रामभाऊ बालपांडे या शेतकऱ्यांच्या घरी भरीत भाकरीचे जेवण करुन मुक्काम केला.

यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार राजू पोतदार, आमदार चरणसिंह ठाकूर, आमदार आशिष देशमुख, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, माजी आमदार सुधाकर कोहळे, सरपंच विपीन चाफले आदी उपस्थित आहेत. लोहारी सावंगा येथे आगमन झाल्यानंतर महिलांनी पारंपरिक पद्धतीने त्यांचे स्वागत केले. त्यानंतर सामुदायिक प्रार्थनेत त्यांनी सहभाग घेतला. रामभाऊ बालपांडे या शेतकऱ्याच्या घरी जेवण करुन दिवाळी सणानिमित्त गावकऱ्यांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी, समस्या, दुःख जाणून घेतले. कमी पर्जन्यमानामुळे यावर्षी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करत आहे. नागरिकांना पिण्यासाठी पाणी, जनावरांना चारा आणि उपलब्धतेनुसार सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्र्यांनी संवाद साधतांना सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनी मोकळेपणाने मुख्यमंत्र्यांशी संवाद साधला, आपल्या समस्या मांडल्या. शेतकरी पुरुषोत्तम वघाळे यांनी खोरी प्रकल्पाचा प्रश्न मार्गी लावल्याचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर यासाठी मान्यता देण्यात आली असून लवकरच काम सुरू होणार



असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. जगदीश देशमुख या शेतकऱ्याने ४३ वर्षांपूर्वी पायाभरणी झालेल्या पाझर तलावाची अडचण सोडवून तलाव पूर्ण करण्याची मागणी केल्यानंतर याबाबत आवश्यक कारवाई लवकरच करू, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पाणी फाऊंडेशनचा युवा कार्यकर्ता जयंत चाफले यांनी जुन्या खोरी तलावाचे काम मार्गी लावल्याबद्दल आभार व्यक्त केले. राजेंद्र चाफले व तेजपाल चौधरी यांनी रोही, वाघ, रानडुकरांचा शेती पिकांना मोठा फटका बसत असल्याने त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. सौर कुंपण आपण देतो आहे, परंतु शेतकऱ्यांचा फारसा प्रतिसाद याला मिळत नाही, त्यामुळे शेतीलगतच्या जंगलांनाच शक्य तेथे आपण कुंपण करत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. लोहारी सावंगी येथे पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरिकांना रेशन धान्य वाटपाचा विषय गावकरी यांनी मांडला. दुष्काळी परिस्थितीमुळे सर्व प्रकारच्या शिधापत्रिकांवर धान्य वितरित केले जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तालुकास्तरावर मुख्यमंत्री सहायता कक्ष : अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या एका युवकाचा अपघातात पाय निकामी झाला. त्याला तातडीने वैद्यकीय मदत मिळणे आवश्यक असल्याची बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्या युवकाचा संपूर्ण उपचार करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. जिल्हास्तरावर यापूर्वी मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष सुरू करण्यात आले आहे, दुष्काळी परिस्थितीमुळे तालुका स्तरावर देखील कक्ष सुरू करण्यात येत असल्याचे सांगितले. प्रत्येकाचे म्हणणे मुख्यमंत्र्यांनी आत्मियतेने ऐकून घेतले व त्यावर योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. **गावकऱ्यांनी व्यक्त केली कृतज्ञता :** लोहारी सावंगा नागपूर जिल्ह्याच्या एका टोकावरील गाव आहे. त्यामुळे हे गाव तसे दुर्लक्षितच आहे. परंतू आपण आमच्या गावाला भेट दिली. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्याचे बळ आणि आत्मविश्वास दिला, अशी भावना व्यक्त करत गावकऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त करत मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.



१८ लाख शेतकऱ्यांना ५० हजार सानुग्रह अनुदान

◆ **नियमित कर्जफेड करणा-या शेतक-यांना दिलासा मिळावा, अशी विनंती एका शेतक-याने केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी नियमित कर्ज भरणा-या शेतक-यांना देखील ५० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान आपण देतो आहे. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर नियमित परतफेडीच्या १८ लाख शेतक-यांच्या खात्यात प्रत्येकी ५० हजार जमा केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

अमरावतीत धरणाचे पाणी उन्हाळ्यापर्यंत जपण्याचे प्रयत्न



◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

अमरावती : अमरावती शहराला पाणी देणाऱ्या अप्पर वर्धा धरणातील पाणी उन्हाळ्यापर्यंत पुरावे, यासाठी जिल्हा प्रशासन उपाय शोधत आहे. पाण्याचे बाष्पीभवन कमी करणे आणि पाणी वाचवणे यावर चर्चा सुरू आहे.

बाष्पीभवन

रोखण्यासाठी पाण्यावर पांढरे आच्छादन टाकण्याचे प्रयोग केले जातात. काही ठिकाणी विशिष्ट रसायन वापरून पाणी आणि सूर्यकिरणांमध्ये अडथळा निर्माण केला जातो. तर काही ठिकाणी थर्मोकोलच्या शीट्स वापरून आच्छादन केले जाते. यंदा पाऊस कमी झाल्याने जलाशयांमधील पाणीसाठा मर्यादित आहे. कडक ऊन कायम राहिल्यास पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होऊ शकते. त्यामुळे बाष्पीभवन कमी होण्यासाठी आणि पाणी वाचवण्यासाठी थंडी पडणेही महत्त्वाचे ठरणार आहे.

दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून, बारावीची ६ फेब्रुवारीपासून; राज्य मंडळाकडून अंतिम वेळापत्रक जाहीर

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, बारावीची लेखी परीक्षा ६ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ या दरम्यान होणार आहे. विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक ६ डिसेंबरपासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाणार आहे.

नऊ विभागीय मंडळांमार्फत परीक्षा : राज्य मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे परीक्षांच्या

6 डिसेंबरपासून विषयनिहाय वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध; प्रात्यक्षिक परीक्षांच्या तारखाही निश्चित



तारखांची माहिती दिली. राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत. अंतिम वेळापत्रक जाहीर झाल्यामुळे शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना आगामी परीक्षांचे नियोजन करणे शक्य होणार आहे. **प्रात्यक्षिक परीक्षांचेही वेळापत्रक निश्चित :** बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत होणार आहेत. तर दहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी आणि अंतर्गत मूल्यमापन २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत पार पडणार आहे.

अधिकृत वेळापत्रकावरच विश्वास ठेवण्याचे आवाहन : मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध होणारे वेळापत्रक विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी असेल. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणारे छापील वेळापत्रक अंतिम मानले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यानुसारच परीक्षेची तयारी करावी, असे मंडळाने स्पष्ट केले आहे. तसेच अन्य संकेतस्थळांवर किंवा समाजमाध्यमांवर प्रसारित होणाऱ्या वेळापत्रकावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन डॉ. दीपक माळी यांनी केले आहे. परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे.

वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळवून देण्यासाठी ५० हजारांची लाच; मुख्याध्यापकाला अटक

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

अहिल्यानगर : शिक्षिकेला वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करून देण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना मुख्याध्यापकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली. या प्रकरणात शिक्षण संस्थेच्या अध्यक्षाविरुद्धही संगमनेर तालुक्यातील घारगाव पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नाशिकच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ढालगाव येथे ही कारवाई केली. याबाबत नगर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी माहिती दिली.

संजय दगडू राणे (वय ५५, या. घारगाव, संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या मुख्याध्यापकाचे नाव आहे. तर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाश चांदमल बोरा (या. आणे, जुन्नर, पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोरा यांचा अटकेसाठी शोध सुरू असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सांगितले. या प्रकरणातील तक्रारदार शिक्षिकेची १५ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे. त्यांनी सेवेत १२ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मिळणाऱ्या वरिष्ठ वेतनश्रेणीच्या लाभासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण सन २०२४-२५ मध्ये पूर्ण केले होते. त्यासंबंधीचे प्रमाणपत्रही त्यांनी शाळेत जमा केले होते. मात्र, त्यांना अद्याप वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळाला नव्हता. त्यामुळे संबंधित शिक्षिकेने जून २०२६ मध्ये वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, यासाठी मुख्याध्यापक संजय राणे यांच्याकडे अर्ज सादर केला. या अर्जाच्या अनुषंगाने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्यासाठी आवश्यक ठराव करून देण्याच्या मोबदल्यात संस्थेचे अध्यक्ष श्रीप्रकाश बोरा यांनी ५० हजार रुपयांची लाच मागितल्याचे मुख्याध्यापक राणे यांनी शिक्षिकेला सांगितले. यानंतर शिक्षिकेने आणे येथे जाऊन संस्था अध्यक्ष बोरा यांची भेट घेतली. त्यावेळी बोरा यांनी ठराव पाठविण्यासाठी ५० हजार रुपयांची मागणी केली आणि ही रक्कम मुख्याध्यापकांकडे जमा करण्यास सांगितले. यासंदर्भात शिक्षिकेने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने विभागाच्या पथकाने पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली. त्यानंतर घारगाव येथील शाळेत मुख्याध्यापक संजय राणे यांनी पंच साक्षीदारांच्या उपस्थितीत तक्रारदार शिक्षिकेकडून ५० हजार रुपयांची लाच स्वीकारली. याचवेळी पथकाने कारवाई करून राणे यांना



ताब्यात घेतले. लाचेची रक्कम स्वीकारल्यानंतर मुख्याध्यापक राणे यांनी मोबाईलवरून संस्था अध्यक्ष श्रीप्रकाश बोरा यांच्याशी संपर्क साधला होता. बोरा यांच्या सांगण्यावरून ही रक्कम स्वीकारल्याचे तसेच ती स्वत:कडे ठेवून घेण्यास बोरा यांनी सांगितल्याचे तपासात समोर आल्याने त्यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अध्यक्ष बोरा यांचा शोध सुरू असून, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

अग्रलेख

विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची परीक्षा...

महाराष्ट्रातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया जणू काही विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची परीक्षा पाहणारी ठरली आहे.

डिप्लोमा पूर्ण करणे ही विद्यार्थ्याची मोठी शैक्षणिक कामगिरी असते. तीन वर्षांचे तांत्रिक शिक्षण, प्रात्यक्षिके, प्रकल्प, परीक्षेनंतर तो अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षासाठी पात्र ठरतो. पदवी, चांगली नोकरी आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे स्वप्न घेऊन तो पुढे येतो; मात्र या टप्प्यावर शिक्षणाची संधी उघडण्याऐवजी प्रवेशव्यवस्थेचे गुंतागुंतीचे आव्हान त्याच्यासमोर उभे राहते. ऑनलाईन अर्ज, कागदपत्रे अपलोड करणे, पडताळणी, गुणवत्ता यादी, पसंतीक्रम, प्रवेश फेरी, त्यानंतर सध्याचा पर्याय स्वीकारायचा की पुढील फेरीची वाट पाहायची, हा निर्णय, अशी ही प्रक्रिया असते. तीन वर्षांची मेहनत करून पात्रता मिळवलेल्या विद्यार्थ्याला पुढे जाण्यासाठी व्यवस्थेची आणखी एक परीक्षा का द्यावी लागते? ऑनलाईन प्रक्रियेत तांत्रिक अडचणी, लॉगिन समस्या, कागदपत्रांच्या अटी किंवा अस्पष्ट सूचना अडथळा ठरतात. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी सायबर कॅफे, स्कॅनिंग, प्रिंटिंग, इंटरनेट आणि प्रवासाचा खर्च ही स्वतंत्र कसरत असते. या प्रक्रियेचा भार पालकांवरही असतो. पदवीचे शुल्क, वसतिगृह, प्रवास आणि इतर खर्चाचे नियोजन करताना प्रत्येक फेरीबरोबर नवे प्रश्न उभे राहतात. मिळालेला पर्याय स्वीकारायचा की पुढील फेरीची वाट पाहायची? एवढ्या धावपळीनंतरही अंतिम प्रश्न तोच, मुलाच्या भवितव्यासाठी योग्य निर्णय झाला आहे का? या प्रक्रियेतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे थेट द्वितीय वर्षासाठी उपलब्ध जागा आणि वाढती मागणी. डिप्लोमाधारक विद्यार्थ्यांची संख्या मोठी असताना तुलनेने मर्यादित जागांमुळे स्पर्धा तीव्र होते आणि कटऑफ वाढतो. परिणामी, चांगले गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांनाही अपेक्षित शाखा किंवा संस्था मिळत नाही. मग, 'चांगले कॉलेज की आवडती शाखा' हा पेच निर्माण होतो. काही विद्यार्थ्यांना कॅप फेरीतील पर्यायाऐवजी संस्थात्मक फेरीत अधिक शुल्क भरून प्रवेश घेण्याचा मार्ग स्वीकारावा लागतो. गुणवत्तेच्या जोरावर पात्र ठरलेल्या विद्यार्थ्याला आर्थिक क्षमतेनुसार वेगवेगळ्या संधी उपलब्ध होणे, ही शिक्षणातील समतेची गंभीर बाब आहे. पसंतीक्रम भरतानाही विद्यार्थ्याची परीक्षा होते. आवडती शाखा पहिल्या क्रमांकावर ठेवायची की प्रतिष्ठित कॉलेज? सध्याचा प्रवेश घ्यायचा की पुढील फेरीची वाट पाहायची? वर्ष वाया जाण्याची भीती, पालकांचा दबाव, वाढत्या कटऑफचे गणित यामुळे निर्णय अनेकदा आवडीपेक्षा भीतीतून घेतला जातो. यात विश्वासार्ह माहितीचा अभाव हा आणखी एक अडथळा आहे. विद्यार्थ्याला मागील कटऑफ, उपलब्ध जागा, शुल्क, सुविधा, शैक्षणिक कामगिरी, प्लेसमेंटची अद्ययावत माहिती एका अधिकृत व्यासपीठावर सहज मिळाली पाहिजे. सोशल मीडिया, विविध संकेतस्थळे आणि ऐकीव माहितीवरून विद्यार्थ्याने स्वतःच हे गणित मांडणे योग्य नाही. प्रवेशव्यवस्थेत काही मूलभूत बदल आवश्यक आहेत. पडताळलेली कागदपत्रे पुन्हा मागू नयेत. प्रत्येक फेरीपूर्वी शाखानिहाय, संस्थानिहाय उपलब्ध जागांची स्पष्ट माहिती द्यावी. तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये, यासाठी प्रभावी तक्रार निवारण यंत्रणा असावी. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष सहाय्य केंद्रे, करिअर मार्गदर्शन उपलब्ध असावे. विद्यार्थ्याला निर्णयासाठी पुरेसा वेळ, वस्तुनिष्ठ माहिती मिळणेही आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एकच 'सर्वोत्तम कॉलेज' किंवा 'सर्वोत्तम शाखा' नसते. आवड, क्षमता, आर्थिक परिस्थिती आणि भविष्यातील उद्दिष्टांनुसार प्रत्येकाची निवड वेगळी असू शकते. त्यामुळे व्यवस्थेने विद्यार्थ्याच्या वतीने निर्णय न घेता योग्य निर्णय घेण्यासाठी त्याला सक्षम केले पाहिजे. प्रवेशाचे अंतिम उद्दिष्ट रिक्त जागा भरणे नसावे. योग्य विद्यार्थ्याला योग्य अभ्यासक्रम आणि योग्य संधी मिळवून देणे हे असावे. प्रवेश म्हणजे केवळ एका विद्यार्थ्याला मिळालेली सीट नाही, तो त्याच्या तीन वर्षांच्या मेहनतीचा, पालकांच्या कष्टाचा आणि त्याच्या भविष्याचा पुढचा टप्पा आहे. आता विद्यार्थ्याची परीक्षा घेण्यापेक्षा व्यवस्थेने स्वतःची परीक्षा देण्याची वेळ आली आहे. एकच प्रश्न समोर ठेवून की, विद्यार्थ्याचा प्रवेश प्रवास आपण किती सोपा, पारदर्शक, न्याय्य आणि तणावमुक्त केला? कारण, प्रवेश प्रक्रिया विद्यार्थ्याच्या स्वप्नांना दिशा देणारी असावी. त्याच्या स्वप्नांची परीक्षा घेणारी नसावी.

अर्थशास्त्र



मानवाला उपलब्ध असलेल्या मर्यादित साधनसंपत्तीचा उपयोग करून मानवाच्या असंख्य गरजांची शक्य तितकी अधिक पूर्ती कशी करावी, याचा विचार करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. अर्थशास्त्राच्या विकासाच्या प्रारंभीच्या काळात लोकांचे उपजीविकेचे दैनंदिन व्यवहार कसे चालतात, राष्ट्राची संपत्ती कशी वाढविता येईल यांसारख्या प्रश्नांचे विवेचन करणे हे अर्थशास्त्राचे कार्य आहे, असे ढोबळपणे समजले जात असे. या सर्व प्रश्नांच्या मागे असणारी मूलभूत समस्या स्पष्ट करण्याचे श्रेय प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ रॉबिन्स, लायोनेल चार्ल्स रॉबिन्स यांचे आहे. 'मानवाच्या अमर्याद गरजा आणि त्या भागविण्यासाठी उपलब्ध असलेली मर्यादित परंतु विविध उपयोगाची साधने यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या मानवी व्यवहाराचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय', रॉबिन्स यांनी केलेल्या व्याख्येमुळे अर्थशास्त्रविषयक विचारांत अधिक स्पष्टता आली.

मानवाच्या गरजा या अमर्याद असतात. गरज, म्हणजे इच्छा, अमर्याद असणे हा एक मानवी मनाचा धर्म आहे. या सर्व गरजा पूर्णपणे भागू शकतील अशी साधनसामग्री मानवाला उपलब्ध नसते. ज्या गरजा काही प्रमाणात भागविता येणे शक्य असते, त्यांच्याही बाबतीत उपलब्ध निसर्गदत्त साधनसामग्रीवर मानवाला आपल्याकडे उपलब्ध असलेली मर्यादित श्रमशक्ती वापरावी लागते. मानवी श्रमाचा वापर न करता मानवाच्या गरजा पूर्णपणे आणि नीटपणे भागू शकतील, अशी फारच थोडी साधनसामग्री निसर्गाने मुक्तहस्ताने मानवाला दिली आहे. उदा., हवा, प्रकाश इत्यादी; तरी हवेचीदेखील शीतोष्णता सुसह्य व्हावी यासाठी काही तजवीज करावी लागते. निदान अशा सुसह्य हवेच्या प्रदेशात जाऊन वास्तव्य करावे लागते किंवा काही पशुपक्ष्यांप्रमाणे ऋतुमानाप्रमाणे स्थलांतर करण्याची तयारी ठेवावी लागते. प्रकाशाची तजवीज अंधाऱ्या रात्री करावी लागते. मानव आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गसंपत्तीचे नवनवे साठे उपलब्ध करून घेऊ शकतो, ही गोष्ट खरी. उद्या चंद्र व मंगळ यांसारख्या काही ग्रहगोलांवरूनही तो मूल्यवान खनिज द्रव्ये आणू शकेल; परंतु असा प्रयत्न कितीही वाढविला, तरी त्याला निसर्गाने घातलेली मर्यादा ही अखेर राहणारच. या मर्यादित साधनसामग्रीच्या आधारे आपल्या मनातील अमर्याद भौतिक सुखांची इच्छा पूर्ण करण्याची मानवाची धडपड असते. ज्यांनी आपल्या ऐहिक सुखोपभोगाच्या लालसेवर स्वाभाविक विजय मिळविलेला आहे, असे काही उच्च कोटीतील साधुसंत वगळले, तर सर्वसाधारण मनुष्याविषयी हे विधान संपूर्ण सत्याथनि आपल्याला करता येईल. क्षितिज गाठण्यासाठी म्हणून क्षितिजाकडे चालू लागले, की ते उत्तरोत्तर पुढेच सरकत राहते, त्या पद्धतीचाच हा भौतिक इच्छापूर्तीचा प्रयत्न राहतो. यामुळे साधनसामग्री कितीही वाढत गेली, तरी मानवाच्या गरजा या तिच्याहीपुढे दौडत राहणे अटळ आहे. अशा परिस्थितीत मानवापुढे एक प्रश्न उपस्थित होतो. उपलब्ध असलेली साधनसामग्री विविध गरजांच्या पूर्तीसाठी वापरण्याची शक्यता असते. ही मर्यादित साधनसामग्री अमर्याद गरजांपैकी कोणत्या गरजा किती प्रमाणात पूर्ण करण्यासाठी वापरली जावी, हे त्या प्रश्नाचे स्वरूप होय. हेच आर्थिक प्रश्नाचे स्वरूप होय. आपल्याला उपलब्ध असणारा वेळ व श्रमशक्ती ही शिकार करण्यासाठी किती प्रमाणात वापरावी व फुले गोळा करण्यासाठी किती प्रमाणात वापरावी, याचा ज्या वेळी आदिमानवाने आपल्या मनाशी प्रकट-अप्रकट विचार केला असेल, त्या वेळी तो या दृष्टीने आर्थिक प्रश्नाचाच विचार करीत होता. आज मानवापुढे उभ्या असणाऱ्या आर्थिक प्रश्नाचे मूलभूत स्वरूप हेच आहे; मात्र सध्याच्या आपल्या समाजव्यवस्थेत हे आर्थिक व्यवहार कितीतरी अधिक गुंतागुंतीचे झालेले आहेत इतकेच. रॉबिन्स यांनी स्पष्ट केलेले आर्थिक प्रश्नाचे मूलभूत स्वरूप हे असे आहे. हा प्रश्न मानवासमोर त्याच्या आदिकालापासून उभा राहत आला आहे व तो मानवजातीसमोर निरंतर उभा राहणार आहे.

अर्थशास्त्राच्या विकासाची पार्श्वभूमी : आपल्यापुढे उभ्या असणाऱ्या प्रत्येक व्यावहारिक प्रश्नाचे उत्तर मानव शोधत असतो. अगदी सुरुवातीचे प्रश्नही गुंतागुंतीचे नसतात व त्यांची उत्तरेही तशी फार मोठी बिकट नसतात. त्या काळात अशा उत्तरांचा कोणी 'शास्त्र' अशा पदवीने गौरव करीत नाही; परंतु प्रश्न जसजसे अधिक गुंतागुंतीचे होऊ लागतात, तसतसा त्यांचा अधिक मूलगामी विचार करावा लागतो. विविध उत्तरांचा परस्पर मेळ बसतो की नाही, हे पाहावे लागते व अशा विकसित होत जाणाऱ्या व्यवस्थेतून त्या त्या विषयाचे शास्त्र तयार होत जाते. साहजिकच, मानवी संस्कृतीच्या सुरुवातीच्या कालखंडात ज्या वेळी आर्थिक व्यवहार सरळ आणि ढोबळ होते, त्या वेळी अर्थशास्त्रही अगदीच प्राथमिक अवस्थेत होते. मुख्य उत्पादन हे शेतीचे असे; विनिमय बहुतेक वस्तूंच्या प्रत्यक्ष अदलाबदलीने होत असे; विविध वेतनमूल्ये ही सामाजिक परंपरेने व रूढीने ठरलेली असत; अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार हा मर्यादित स्वरूपातच चालत असे; आर्थिक जीवनाचा मुख्य घटक कुटुंब असे. अशा काळात आर्थिक प्रश्नाच्या शास्त्रीय अभ्यासाची विशेष निकड न वाटणे साहजिक होते. पाश्चिमात्य अर्थशास्त्राचा उगमही असाच ग्रीसच्या भूमीपर्यंत शोधता येतो. किंबहुना अर्थशास्त्राला गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत इंग्रजीत असणारे 'पोलिटिकल इकॉनॉमी' हे नामाभिधान प्राचीन ग्रीक लोकांच्या काळातील या शास्त्राच्या स्वरूपाचे निदर्शक होते. कुटुंबाहून मोठी असणारी संघटना ही ग्रीस देशात नगरराज्याची होती. 'Oikonomos' हा ग्रीक शब्द सर्वसामान्यपणे 'कुटुंब' अशा आशयाचा निदर्शक आहे. त्याचप्रमाणे ग्रीसमधील नगरराज्यांना 'Polis' अशी संज्ञा होती. 'पोलिटिकल इकॉनॉमी' हे एखाद्या कुटुंबाच्या अर्थव्यवहाराचा विचार करावा त्याप्रमाणे नगरराज्यांच्या अर्थव्यवहारांचा विचार करणारे 'राजकीय अर्थव्यवहाराचे शास्त्र' होते. ग्रीक नगरराज्ये मागे पडली, रोमन साम्राज्याचा उदय झाला, ख्रिश्चन धर्माचा यूरोप खंडात सार्वत्रिक प्रसार झाला; परंतु या अनेक शतकांच्या काळात समाजाची मुख्य आर्थिक बैठक फारशी बदलली नाही. ती बैठक सरंजामशाही अर्थव्यवस्थेची होती. शेती हेच राष्ट्राचे मुख्य उत्पादन होते. जमीन ही सरदार-जमीनदार यांच्या मालकीची होती. कुळे व भूदास त्या जमिनीची कसवणूक करीत होते. व्यक्तीचे समाजातील स्थान, प्रतिष्ठा, तिचे अधिकार, तिचे जीवनमान इत्यादी गोष्टी या समाजरचनेत परंपरेने दृढमूल झालेल्या होत्या. या व्यवस्थेत अन्याय होता; परंतु तो स्थिरपद झालेला होता. दररोज विचार करावयास लावणारे नवनवीन गुंतागुंतीचे प्रश्न त्या अर्थव्यवस्थेत निर्माण होण्याचे कारण नव्हते. पंधराव्या शतकानंतर ही परिस्थिती बदलत गेली व अठराव्या शतकापासून तर ती फारच झपाट्याने बदलू लागली. पंधराव्या, सोळाव्या व सतराव्या शतकांत अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ होत गेली व ज्या परिवर्तनाला व्यापारी क्रांती म्हणून संबोधले जाते, ती क्रांती घडून आली. यानंतरच्या काळात नवीन यंत्रांचा शोध लागला. उत्पादनतंत्रात बदल होत गेला व जिला औद्योगिक क्रांती म्हणून ओळखले जाते, ती क्रांती घडून आली. व्यापारी क्रांतीच्या काळात अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला. विनिमयासाठी चलनाचा अधिक प्रमाणात वापर होऊ लागला. धनिक व्यापारी वर्ग निर्माण झाला व त्याने सरंजामदार वर्गाच्या सत्तेला शह देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. औद्योगिक क्रांतीने ही प्रक्रिया आणखी पुढे नेली. वाढत्या व्यापारासाठी अधिक उत्पादनाची गरज निर्माण झाली. या गरजेपोटी नवीन शोधांचा जन्म झाला. जुन्या छोट्या घरगुती उद्योगधंद्यांच्या जागी नवे मोठे कारखाने निर्माण झाले. या कारखान्यांच्या चढाओढीमुळे बसलेल्या घरगुती उद्योगधंद्यांतील कामगारांना उदरनिर्वाहासाठी या कारखान्यांत मजूर म्हणून जाणे भाग पडले. सरंजामशाही अर्थव्यवस्थेत कुळे व भूदास यांना परंपरेचा जो काही थोडासा आधार व संरक्षण होते, तेही या नवीन वर्गातील मजुरांना नव्हते. पैशाच्या आधाराने सगळ्या गोष्टींचे मूल्य ठरले जाऊ लागले; इतकेच नव्हे, तर पैसा हेच एक मूल्य होऊन बसले. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवहार केवळ अधिक मोठ्या प्रमाणावर होऊन ते अधिक गुंतागुंतीचे होत चालले. अर्थशास्त्रासमोर आता 'शास्त्र' या पदवीला साजेसे अनेक प्रश्न उपस्थित झाले. वस्तूचे विनिमय-मूल्य कसे ठरते व उत्पादनव्यवस्थेतून झालेल्या उत्पादनाची (किंवा त्याच्या मूल्याची) उत्पादक घटकांमध्ये, म्हणजे भूमी (जमीन), श्रम, भांडवल व संयोजक (प्रवर्तक) यांच्यामध्ये, कशी विभागणी होते, हे या प्रश्नावलीतील प्रमुख गाभ्याचे प्रश्न होत. याखेरीज चलनाला नव्याने प्राप्त झालेल्या महत्त्वाच्या स्थानाच्या संदर्भात चलनाची क्रयशक्ती कशी ठरते, सर्वसाधारण भावमान वरखाली का होते, यांसारखेही महत्त्वाचे प्रश्न होते. भांडवलशाहीचा उदय झाल्यानंतर अर्थव्यवस्थेत काही वर्षे आर्थिक भरभराटीची तर काही वर्षे आर्थिक मंदीची, असे परिवर्तन 'चक्रनेमिक्रमेण' वारंवार आढळून येऊ लागले. त्याची कारणपरंपरा शोधण्याची गरज निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत होता व हा व्यापार खुला असावा की संरक्षक आयात कराचे धोरण स्वीकारावे, हा प्रश्नही निर्णयासाठी पुढे उभा होता. आंतरराष्ट्रीय सुवर्णपरिमाणाचे फायदे-तोटे हळूहळू लक्षात येत होते. अवमूल्यन केव्हा, किती व कसे करावे, यांसारखे व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचे व तातडीचे प्रश्न उपस्थित होत होते. बँकांच्या व्यवसायाची झपाट्याने वाढ होत होती व या व्यवहाराचे अर्थव्यवस्थेवर होणारे महत्त्वाचे परिणाम समजून घेणे आवश्यक होते. राष्ट्रीय मध्यवर्ती बँकेचा व्याजाचा दर कमी करणे किंवा वाढविणे हा आर्थिक आघाडीवरील यशापयशाच्या दृष्टीने आत्यंतिक महत्त्वाचा प्रश्न होऊ लागला. सरकारच्या आर्थिक व्यवहाराची कक्षा उत्तरोत्तर वाढत गेली. इंग्लंड, अमेरिकेची संयुक्त संस्थाने यांसारख्या देशांत एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी तीस ते चाळीस टक्के भाग सरकारकडे कररूपाने वा अन्य मार्गाने येऊ लागला व सरकारच्या हस्ते खर्च होऊ लागला. राष्ट्रांच्या हिताच्या दृष्टीने याविषयीची धोरणे कशी आखावीत, हा अर्थातच एक महत्त्वाचा प्रश्न झाला. १९२८ मध्ये रशियाने आपली पंचवार्षिक योजना सुरू केली. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रांनी योजनाबद्ध आर्थिक विकासाचा कार्यक्रम स्वीकारला. या कार्यक्रमात निर्माण होणाऱ्या समस्यांचे स्वरूप समजून घेणे व त्या समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करणे निकडीचे झाले. प्रगत राष्ट्राचे आर्थिक उत्पन्न सतत वाढते कसे ठेवता येईल, अप्रगत राष्ट्रांचा आर्थिक विकास जलद गतीने कसा साधता येईल, जनतेचे जीवनमान सतत उंचावत ठेवून तिचे दैन्यदारिद्र्य कसे दूर करता येईल, यांसारखे प्रश्न हे आजही महत्त्वाचे आर्थिक प्रश्न म्हणून मानवतेपुढे उभे आहेत. हे सर्व प्रश्न एकाच वेळी व एकदम सारख्याच तीव्रतेने निर्माण झाले, असे नव्हे. या सर्व प्रश्नांची शास्त्रीय उपपत्ती आपण पूर्णपणे सांगू शकलो आहोत, असेही नाही. काही प्रश्नांच्या बाबत उत्तरे शोधण्याचे हे काम अधिक प्रमाणात पूर्ण झालेले आहे, तर काहींच्या बाबतीत आपल्याला अद्याप पुरेसे यश मिळालेले नाही; परंतु हे कसेही असले, तरी अर्थशास्त्र आज ज्या प्रश्नांचा विचार करीत आहे, ते पूर्वीच्या कालखंडापेक्षा कसे अधिक व्यापक क्षेत्रातील व गुंतागुंतीचे आहेत, हे या प्रश्नावलीवरून स्पष्ट होईल. या प्रश्नांचा अभ्यास ही मुख्यत्वेकरून गेल्या दोन शतकांतील घटना आहे. त्या प्रश्नांचा विशेष तपशिलाने शाखावार अभ्यास ही तर गेल्या काही दशकांतीलच घटना आहे. या काही दशकांत मात्र अर्थशास्त्राने तपशिलाचा अभ्यास व सिद्धांतांची मांडणी या दृष्टीने अतिशय झपाट्याने प्रगती केली आहे. भौतिक शास्त्रांच्या काटेकोर अभ्यासाच्या पद्धतीने अभ्यास करण्याच्या प्रयत्नात, भौतिक शास्त्रांच्या अध्ययनपद्धतीच्या अधिकाधिक जवळ येणारे सामाजिक शास्त्र हे अर्थशास्त्रच होय.

अर्थशास्त्राची संदर्भचौकट : 'शास्त्र' या दृष्टीने व शास्त्रशुद्ध मांडणीच्या दृष्टीने वाटचाल करीत असताना अर्थशास्त्राला कोणत्याही सामाजिक शास्त्राला भासमान होणाऱ्या मर्यादांचा स्वीकार हा स्वाभाविकपणेच करावा लागतो. कोणत्याही सामाजिक शास्त्राचे विवेचन समाजनिरपेक्ष होऊ शकत नाही, ही एक अशी महत्त्वाची मर्यादा होय. यामुळे कोणत्या समाजव्यवस्थेच्या चौकटीच्या संदर्भात हा शास्त्रीय विचार केला जात आहे, याचे अवधान ठेवणे आवश्यक असते. ज्या समाजव्यवस्थेत तत्त्वचिंतक वावरत आहे, त्या समाजव्यवस्थेतील मूल्ये अनेकदा त्याने अजाणतापण अटळपणे स्वीकारलेली असतात. या समाजव्यवस्थेचा अपुरेपणा त्याला ज्या वेळी जाणवू लागतो, त्या वेळी तो एखाद्या आदर्शवादाच्या मागे लागतो किंवा त्याच्या मते शास्त्रशुद्ध अशी नवी मांडणी करण्याच्या प्रयत्नाकडे वळतो. याच पद्धतीने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारे अर्थशास्त्रज्ञ निर्माण झाले. त्या व्यवस्थेच्या परंपरेत राहून तिच्यातील काही दोषांवर टीका करणारे टीकाकार झाले. स्वप्नाळू समाजवादाची चित्रे रंगवणारे हळव्या मनाचे अभ्यासक झाले. शास्त्रशुद्ध समाजवादी अर्थशास्त्राची मांडणी करणारे कार्ल मार्क्स व त्याचे अनुयायी झाले. अगदी अलीकडे आपल्याकडे गांधीजींच्या मानवी जीवनाच्या आदर्शाच्या संदर्भात, अर्थशास्त्राची मांडणी करू पाहण्याचा प्रयत्नही आपल्याला भारतात पाहावयास मिळाला. प्रत्येक विचारवंताचे त्याला अभिप्रेत असलेल्या चौकटीचे एक स्वप्न असते. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांना अभिप्रेत असलेली चौकट व कट्टर मार्क्सवादी विचारसरणीच्या अर्थशास्त्रज्ञांना अभिप्रेत असणारी चौकट या दोन्ही या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. या दोन्हीही चौकटी परिस्थितीच्या वास्तव स्वरूपापासून विविध विभागांत कमीअधिक प्रमाणात ढळलेल्या आहेत. सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या मते भांडवलशाही व्यवस्था ही निसर्गत:च एक सर्वोत्कृष्ट अर्थव्यवस्था म्हणून अस्तित्वात आलेली आहे. त्यांच्या मते समाजातील विविध वर्गांत मूलभूत संघर्ष असण्याचे कारण नाही. या अर्थशास्त्रज्ञांचा सारा प्रयत्न तत्त्वचिंतन करून अर्थव्यवस्थेत पायाभूत अशी अनादिकालापासून चालत आलेली मानवी व्यवहाराची आदिसूत्रे शोधून काढण्यासाठी होता. आपण घालत असलेला पाया मात्र वस्तुस्थितीच्या भक्कम आधारावर उभा आहे की नाही, हे पाहण्याचे अवधान त्यांना राहिले नाही. अशा पायावर आधारलेले निर्णय किंवा सिद्धांत बाह्यत: आकर्षक व ठाकठीक वाटले, तरी व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीने कमकुवत ठरतात.




रॉयल इकॉनॉमिक सोसायटी

अर्थशास्त्राचा प्रसार, विकास आणि विस्तार करण्यासाठी इंग्लंडमध्ये स्थापन झालेली एक अग्रगण्य संस्था. या संस्थेची मूळ स्थापना २० नोव्हेंबर १८९० रोजी ब्रिटिश इकॉनॉमिक सोसायटी या नावाने झाली; मात्र २ जून १९०२ रोजी नाव बदलून रॉयल चार्टरखाली तिचे 'रॉयल इकॉनॉमिक सोसायटी' या नावाने नोंदणी करण्यात आली.

आधुनिक अर्थशास्त्राची स्थापना पाश्चात्य देशांमध्ये साधारणपणे अठराव्या शतकाच्या मध्यास झाली, असे मानले जाते. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ ॲडम स्मिथ यांनी इ. स. १७७६ मध्ये लिहिलेल्या वेल्थ ऑफ नेशन्स या पुस्तकाने त्या विषयास चालना मिळाली. सुरुवातीस या विषयाचे 'राज्यसंस्थेला आर्थिक-राजकीय धोरण शिकविणारी शाखा' असे स्वरूप होते. तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, लोकप्रशासन, इतिहास अशा विद्याशाखांच्या बरोबरीने अर्थशास्त्राचा विकास होत गेला; मात्र स्वतंत्र विषय म्हणून अर्थशास्त्राचा विचार व्हावा व तसा अभ्यास व्हावा असा विचार एकोणिसाव्या शतकाच्या शेवटास जोर धरू लागला. इ. स. १८८७ मध्ये अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशनची स्थापना होऊन अशा स्वतंत्र विचारास अधिक बळकटी आली. प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ ॲल्फ्रेड मार्शल यांनी इ. स. १८९० मध्ये लिहिलेल्या प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स या प्रसिद्ध पुस्तकाने अर्थशाखेच्या नव्या व स्वतंत्र स्वरूपावर शिक्कामोर्तब केले. फ्रान्समध्येही यासारखी संस्था अस्तित्वात येऊन कार्य करू लागली होती. या सर्व पार्श्वभूमीवर इंग्लंडमधील हर्बर्ट फॉक्सवेल आणि सर रॉबर्ट पाल्येव यांनी पुढाकार घेऊन 'रॉयल इकॉनॉमिक सोसायटी'ची रीतसर स्थापना केली. आर्थिक सिद्धांत आणि मूलतत्त्वे, आर्थिक धोरणांचा विचार, त्यांचे विश्लेषण व त्यावर होणारे संशोधन या सर्वांना ही सोसायटी चालना देते. सोसायटीचा कारभार नियामक मंडळ करीत असते. अर्थशास्त्राच्या विकासासाठी आणि प्रसारासाठी धोरणे ठरविणे, विविध उपक्रमांची आखणी करणे आणि त्यावर कार्यवाही करणे अशी प्रमुख कामे सोसायटीची आहेत. वार्षिक अधिवेशन घेणे, विशेष संशोधन प्रकल्पांना अनुदान देणे, वार्षिक व्याख्यानमाला आयोजित करणे, निबंध स्पर्धेचे आयोजन करणे अशा विविध कार्यक्रमांचा यामध्ये समावेश असतो. सोसायटीचे सुमारे ४,००० सभासद आहेत. जॉर्ज गोशेन हे एक राजकारणी व उद्योगपती सोसायटीचे पहिले अध्यक्ष होते. सोसायटीतर्फे अर्थशास्त्राच्या जगतात मान्यता पावलेली इकॉनॉमिक जर्नल आणि इकॉनोमेट्रिक्स जर्नल ही दोन विख्यात नियतकालिके नियमितपणे प्रकाशित केली जातात. या श्रेष्ठी समीक्षित नियतकालिकांमध्ये आर्थिक सिद्धांत, धोरण, विश्लेषण यांवरील शोधनिबंधांचा प्रामुख्याने समावेश असतो. यांपैकी इकॉनॉमिक जर्नल या नियतकालिकाची सुरुवात मार्च १८९१ रोजी झाली, तर इकॉनोमेट्रिक्स जर्नल याची सुरुवात १९९८ मध्ये झाली. एजवर्थ हे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ इकानॉमिक जर्नलचे पहिले संपादक असून ते सुमारे ३४ वर्षे या पदावर होते.

सोसायटीच्या पुढाकाराने अनेक प्रकाशने प्रसिद्ध करण्यात आली आहेत. उदा., मार्शल यांचे प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स हे पुस्तक, रिकार्डो या अभिजात अर्थतज्ज्ञांचा पत्रव्यवहार, एजवर्थ यांची पुस्तके, द इकॉनॉमिक ॲडव्हायझरी कौन्सिल हे पुस्तक या सर्वांसाठी सोसायटीने प्रयत्न केलेले आढळतात.

सोसायटीचा सुरुवातीचा इतिहास कोट्स यांनी इकॉनॉमिक जर्नलमध्ये १९६८ मध्ये प्रसिद्ध केला. तसेच जॉन हे व डोनाल्ड बिंच यांनी अ सेंच्युरी ऑफ इकॉनॉमिक्स हंड्रेड यिअर्स सोसायटी अँड इजे हे पुस्तक संपादित करून १९९० मध्ये प्रसिद्ध केले. सोसायटीने निरनिराळ्या विषयांवरील वार्षिक अधिवेशने प्रायोजित केली आहेत. उदा., डिसिजन ॲनालिसीस १९७३, वेजेस अँड अनएम्प्लॉयमेंट १९८१, एक्सचेंज रेट १९८६. सोसायटीद्वारे २००१ पासून दर वर्षी आर्थिक धोरणावर एक वार्षिक व्याख्यान आयोजित केले जाते. तरुण अर्थतज्ज्ञांसाठी २००७ पासून एक निबंध स्पर्धा घेण्यास येत असून त्यांनी लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी ऑस्टिन रॉबिन्सन पारितोषिक देण्यात येते. तसेच सर्व अर्थतज्ज्ञांचा एकत्रित विचार करून उत्कृष्ट शोधनिबंधासाठी रॉयल इकॉनॉमिक सोसायटी पारितोषिक देण्यात येते. याची सुरुवात १९९० मध्ये झाली. अर्थशाखाच्या व्यवसायात महिलांच्या सहभागाची आणि योगदानाची सोसायटीकडून विशेष दखल घेतली जाते.



त्यासाठी १९९६ मध्ये एक स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली. २०११ पासून इकॉनोमेट्रिक्स जर्नलमधील सर्वोत्कृष्ट शोधनिबंधासाठी पारितोषिक दिले जाते. सोसायटीची वार्षिक परिषद २५ ते २७ मार्च २०२४ या काळात क्विन युनिव्हर्सिटी बेलफास्ट येथे होण्याचे प्रस्तावित आहे.

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)
Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711
हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर-जि.बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो.माळीपेठ, इमाम बाडा चौक, मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक- शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा.9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादिववाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत
(टिप:- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.)

आदिवासी पाड्यावरही शिवसैनिकांकडून आनंदाच्या शिध्याचे वाटप!

दुष्काळाच्या झळांनी होरपळलेल्या टेंभूरखेडमधील गोरगरीबांच्या दिवाळीत गोडवा; शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात!

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन



घाटबोरी : दिवाळीच्या मंगलमय पर्वात प्रत्येकाच्या घरात आनंदाचे दीप उजळावेत, प्रत्येकाच्या चुलीवर गोडधोड शिजावे आणि आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही गोरगरीब कुटुंबाच्या सणाचा आनंद हिरावला जाऊ नये, हीच सामाजिक बांधिलकीची भावना जोपासत त्या भावनेला कृतीची जोड देत मेहकर तालुक्यातील दुर्गम आणि आदिवासीबहुल टेंभूरखेड, नागेशवाडी गावातील गोरगरीब कुटुंबांच्या उंबरठ्यापर्यंत शिवसैनिकांनी आनंदाचा शिधा पोहोचविला. दुष्काळाच्या झळांनी आधीच होरपळलेल्या कुटुंबांच्या दिवाळीत गोडवा निर्माण करण्याचा हा उपक्रम केवळ शिधावाटपापुरता मर्यादित न राहता, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आनंद पोहोचविण्याच्या सामाजिक जाणिवेचा प्रत्यय देणारा ठरला आहे.

मेहकर तालुक्यातील घाटबोरी गट ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या टेंभूरखेड, नागेशवाडी या आदिवासीबहुल गावातही दिवाळीसारखा सण साजरा करताना या कुटुंबांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. हीच परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आनंदाचा शिधा समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचावा, या उदात्त हेतूने विशेष पुढाकार घेतला. त्याच अनुषंगाने मेहकर मतदारसंघासाठी मुंबईहून ट्रकद्वारे आनंदाच्या शिध्याची पाकिटे पाठविण्यात आली आहेत. केंद्रीय आयुष राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे निष्ठावंत शिवसैनिक या उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत आहेत. केवळ मुख्य गावांपुरते मर्यादित न राहता दुर्गम खेड्यापाड्यांमध्ये, आदिवासी वस्त्यांमध्ये आणि गरजू कुटुंबांच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन आनंदाचा शिधा पोहोचविण्याचे काम शिवसैनिकांकडून केले जात आहे. दिवाळीच्या सणात प्रत्येक घरात गोडधोड व्हावे, आर्थिक विवंचनेत असलेल्या कुटुंबांनाही सणाचा आनंद घेता यावा आणि समाजातील वंचित घटकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, या भावनेतून टेंभूरखेड, नागेशवाडी येथे आनंदाच्या शिध्याचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांपर्यंतच नव्हे, तर मंदिरातील महाराजांपर्यंतही पोहोचून शिध्याचे वाटप करण्यात आले. उपक्रमात शिवसेनेचे माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप बापू देशमुख, घाटबोरीचे माजी सरपंच गजानन चनेवार, ग्रामसेवा सोसायटीचे अध्यक्ष प्रल्हाद आप्पा चुकेवार, माजी तंटामुक्ती अध्यक्ष दिलीप पाटील नवले, उपसरपंच विजयसिंग चव्हाण, माजी सभापती वसुदेव खुळे, माजी सरपंच विजय पाटील नवले, माजी उपसरपंच सुभाष पाटील नवले, माजी ग्रामपंचायत सदस्य तानाजी पाटील नवले, प्रवीण जाधव यांच्यासह अनेक शिवसैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंदाच्या शिध्याचे वाटप केले.

● घाटबोरी वनपरिक्षेत्रातील अवैध वृक्षताडण प्रकरण

तिसरा आरोपी अटक, 3 दिवसांची वनकोठडी

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन



मेहकर : तालुक्यातील घाटबोरी येथील वनपरिक्षेत्रातील अवैध वृक्षताडण प्रकरण: तिसरा आरोपी अटक, ३ दिवसांची वनकोठडी डोणगाव बुलढाणा वनविभागांतर्गत येणाऱ्या घाटबोरी वनपरिक्षेत्रातील भोसा बिटमधील कक्ष क्र. १८१ मध्ये झालेल्या अवैध वृक्षतोड प्रकरणातील तिसऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. अमीर खान शौकत खान पठाण रा. सुलतानपूर, ता. लोणार, जि. बुलढाणा असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याला मा. प्रथम न्यायदंडाधिकारी मेहकर यांच्यासमोर हजर केले असता न्यायालयाने ३ दिवसांची वनकोठडी सुनावली आहे. घाटबोरी वनपरिक्षेत्रातील भोसा बिटमधील कक्ष क्र. १८१ तसेच महसूल ई-क्लास गट क्र. ५३३ मध्ये अनुक्रमे १४५ व ७५ सागवान वृक्षांची अवैध तोड झाली होती. याप्रकरणी घाटबोरी वनक्षेत्र अधिकारी यांनी दिनांक ०२/१०/२०२६ रोजी वनगुन्हा क्र. ०३/२०२६ दाखल केला होता. तसेच महसूल ई-क्लास क्षेत्रातील वृक्षतोडीबाबत पोलिस स्टेशन डोणगाव येथेही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात आतापर्यंत २ मुख्य आरोपी व इतर १२ सहआरोपी पकडण्यात आले असून, वनगुन्ह्यात वापरण्यात आलेले जेसीबी, हायड्रा, टेम्पो आणि ट्रॅक्टर जप्त करण्यात आले आहेत. तपास करत असताना तोड झालेला माल अमीर खान शौकत खान पठाण यांच्या मालकीच्या ट्रक क्र. MH28BA3137 ने वाहतूक झाल्याचे निदर्शनास आले. याबाबत ट्रक मालक अमीर खान शौकत खान पठाण यांना चौकशीसाठी ट्रक ताब्यात देण्याबाबत सूचित केले असता, त्यांनीण्यास नकार दिला. तसेच तपासास सहकार्य न केल्यामुळे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१, ४२ अन्वये गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास वैभव काकडे, सहायक वनसंरक्षक मेहकर हे करीत आहेत. सदर यशस्वी कारवाई



श्रीमती ज्योती बॅनर्जी मुख्य वनसंरक्षक प्रा. अमरावती आणि जमीर मुनीर शेख उपवनसंरक्षक, बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली वैभव काकडे सहायक वनसंरक्षक, मेहकर, रवींद्र सातपुते वनक्षेत्र अधिकारी, घाटबोरी, जी. ए. इंगोले सहायक पोलीस निरीक्षक, डोणगाव, विजय आजमीरे पोलिस उपनिरीक्षक, डोणगाव तसेच इतर वन व पोलीस कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आली आहे.

फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा – वनश्री जनाबापू मेहेत्रे यांचे आवाहन

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ रवि ढवळे



सिंदखेडराजा : दिवाळी हा आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण असून हा सण पर्यावरणाचे रक्षण आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करावा, असे आवाहन वनश्री जनाबापू मेहेत्रे यांनी धरती बचाओ मिशन परिवाराच्या वतीने केले आहे. फटाक्यांच्या अतिवापरामुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी व वायुप्रदूषण निर्माण होत असून त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. फटाक्यांमुळे होणारे अपघात, भाजण्याच्या घटना, आगीच्या दुर्घटना तसेच जीवित व वित्तहानी यांचा धोका वाढत आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि पशुपक्ष्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे यंदाची दिवाळी फटाकेमुक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरी करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दिवाळीच्या निमित्ताने अनावश्यक खरेदी आणि दिखाऊपणा टाळून साधेपणाने सण साजरा करावा, विजेचा व पाण्याचा काटकसरीने वापर करावा, प्लास्टिकच्या सजावटीऐवजी आंब्याची पाने आणि झेंडूच्या फुलांसारख्या नैसर्गिक साहित्याचा वापर करावा, तसेच रासायनिक रंगांऐवजी नैसर्गिक रंगांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले. फटाक्यांवर होणारा अनावश्यक खर्च टाळून तो पैसा गरजू आणि गरिबांच्या मदतीसाठी वापरल्यास दिवाळीचा आनंद अधिक द्विगुणित होईल. सध्या अनेक भागांत दुष्काळ आणि पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून पाणी, वीज आणि इंधनाची बचत करणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. पर्यावरणाचे संवर्धन, आरोग्याचे रक्षण आणि आर्थिक बचत या तिन्ही गोष्टींचा विचार करून प्रत्येकाने पर्यावरणपूरक दिवाळीचा संकल्प करावा. "फटाक्यांचा आवाज नको, माणुसकीचा संवाद हवा; प्रदूषणाचा धूर नको, निसर्गाचा सुगंध हवा!" दिवाळीचा खरा आनंद फटाक्यांच्या आतषबाजीत नसून प्रेम, आपुलकी, समाधान आणि निसर्गाच्या सहवासात आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःपासून सुरुवात करून फटाकेमुक्त दिवाळी साजरी करावी, असे आवाहन वनश्री जनाबापू मेहेत्रे यांनी धरती बचाओ मिशन परिवाराच्या वतीने केले आहे. धरती बचाओ! वसुधैव कुटुंबकम!

पेनटाकळीवर जलसमाधीसाठी निघालेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची पीएसआयला मारहाण

● निवेदन देण्यासाठी गेल्यावर मेहकर एसडीपीओ कार्यालयासमोर आंदोलन

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

मेहकर : पेनटाकळी धरणाचे पाणी शेतकऱ्यांना सिंचनासाठी सोडण्याच्या मागणीसाठी विविध राजकीय पक्षांनी आंदोलन सुरू केले आहे. यामुळे पाण्याचे राजकारण चांगलेच पेटले आहे. माजी आमदार संजय रायमूलकर यांनी उपोषण केल्यानंतर मेहकरचे विद्यमान आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात शिवसेना (उबाठा) चा मोर्चा धरणावर धडकला. दरम्यान, ६ नोव्हेंबरला मेहकर एसडीपीओ कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या वतीने पाण्यासाठी आंदोलन सुरू केले. यावेळी आंदोलक व पोलिसांमध्ये बाचाबाची झाल्यानंतर पीएसआयला मारहाण झाल्याने आंदोलनास हिंसक वळण लागले. या प्रकरणी कार्यकर्त्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले.

मेहकर तालुक्यातील लोणी गवळीचे रहिवासी प्रशांत दिलीप वानखेडे (वय ४६) यांनी फेसबुकला 'पेनटाकळीचे पाणी शेतकऱ्यांना मिळालेच पाहिजे, राजकारण बंद करा, आजच्या आज धरणाचे दरवाजे खुले करा, शंभर शेतकऱ्यांसह जलसमाधी आंदोलन, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता, स्थळ पेनटाकळी धरण' अशी पोस्ट टाकली. त्यांच्यासह महादेव सखाराम वानखेडे (वय ५०), शरद गणेश चंद्रे (वय ३६), आनंदा गोपाळा भालेराव (वय ६७) यांच्यासह काही कार्यकर्ते व शेतकरी ६ नोव्हेंबर रोजी पेनटाकळीकडे निघणार होते.

तत्पूर्वी निवेदन देण्यासाठी मेहकर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयावर सकाळी सव्वाअकराच्या सुमारास धडकले. यावेळी डोणगाव पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक विजय मुरलीधर अजमीरे (वय ४०) बंदोबस्तावर होते. उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे यांच्याशी चर्चा करीत असतानाच कार्यकर्ते अचानक आक्रमक झाले. 'तू आमचा नोकर आहेस, पुढे कोणाला पाणी नाही भेटले तरी चालेल, पण आता पाणी सोडण्यासाठी मी जलसमाधी आंदोलन करतोच' असा इशारा प्रशांत पाटील यांनी दिला. तसेच पीएसआय अजमीरे यांच्या अंगावर धावून जात पोटात बुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, पीएसआय अजमीरे यांच्या तक्रारीवरून भारतीय न्यायसंहिता कलम १३२, १२१, २२४, २९६, ३५१ (२), ३५२, ३ (५) नुसार गुन्हे दाखल केले.

'ते' लोक मेले तरी चालतील!

◆ चिखली व बुलढाणा येथील लोक पाण्यावाचून मेली तरी चालतात, पण आम्ही पेनटाकळीचे पाणी घेतल्याशिवाय शांत बसणार नाही, असा इशारा प्रशांत पाटील यांनी पोलीस प्रशासनाला दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे बुलढाणा व चिखली येथे पेनटाकळीच्या पाण्याचा वाद आणखी पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष संक्षिप्त पुनरीक्षणात मतदारांना नाव नोंदणीची आणखी एक संधी

प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांनी गणना प्रपत्र भरून द्यावे; निवडणूक विभागाचे आवाहन

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

बुलढाणा : विशेष संक्षिप्त पुनरीक्षण-२०२६ अंतर्गत महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या पुनरीक्षण प्रक्रियेत काही मतदारांची नावे अनुपस्थित, स्थलांतरित, मृत किंवा दुबार (ASDD – Absent, Shifted, Dead, Duplicate) या कारणांमुळे प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होऊ शकलेली नाहीत. अशा मतदारांना आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून घेण्यासाठी आणखी एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या मतदारांना त्यांच्या सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणी संबंधित सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे गणना प्रपत्र भरून देण्याची सुविधा उपलब्ध आहे. यापूर्वी गणना प्रपत्र भरलेल्या मतदारांची माहिती ECINET प्रणालीद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना उपलब्ध होणार आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मतदार नोंदणी अधिकारी यांच्या माध्यमातून संबंधित मतदारांपर्यंत प्रत्यक्ष, व्हॉट्सॲप, ई-मेल किंवा एसएमएसद्वारे गणना प्रपत्र पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच, मतदार संकेतस्थळ किंवा ECINET ॲपच्या माध्यमातून मतदार आपला EPIC क्रमांक प्रविष्ट करून गणना प्रपत्र डाउनलोड करू शकतात आणि ते भरू शकतात. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींच्या समन्वयाने संबंधित मतदारांशी संपर्क साधणार आहेत. याशिवाय मतदारांचे नातेवाईक, शेजारी, स्थानिक रहिवासी कल्याणकारी संस्था आणि उपलब्ध संपर्क क्रमांकांच्या माध्यमातूनही जनजागृती करण्यात येणार आहे. मूळ निवासस्थानावरून स्थलांतरित न झालेल्या मतदारांनी गणना प्रपत्रासोबत जोडपत्र-बमध्ये यापूर्वी गणना प्रपत्र सादर करता आले नसल्याची माहिती नमूद करणे आवश्यक आहे. तर स्थलांतरित झालेल्या मतदारांनी जोडपत्र-कमध्ये आपला नवीन पत्ता आणि विधानसभा मतदारसंघाची माहिती नमूद करून सध्याच्या निवासस्थानाशी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी किंवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावा. मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या https://ceoelection.maharashtra.gov.in/ceo/ या संकेतस्थळावर ASDD मतदारांची यादी उपलब्ध आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या मतदारांना आपले नाव समाविष्ट करायचे आहे, त्यांनी फॉर्म-६ भरून ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने गणना प्रपत्र सादर करावे. यासाठी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी किंवा मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. दरम्यान, ASDD यादीतील ज्या मतदारांनी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नाव समाविष्ट करण्यासाठी फॉर्म-६ भरला असेल, त्यांना पुन्हा गणना प्रपत्र भरण्याची आवश्यकता नाही, असे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव तपासून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन निवडणूक विभागामार्फत करण्यात आले आहे.

मेहकर तालुक्यातील पारडी येथील माजी सैनिक ताराचंद सवाई राठोड यांचे अल्पशा आजाराने निधन

दिव्य मातृछाया



जानेफळ : मेहकर तालुक्यातील मौजे पारडी येथील रहिवासी आणि देशाची सेवा केलेले माजी सैनिक ताराचंद सवई राठोड यांचे दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने पारडी गाव व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आपल्या सेवाकाळात त्यांनी देशसेवेचे कर्तव्य चोख बजावले होते. सेवानिवृत्तीनंतरही ते गावात सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सून आणि नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. स्वर्गीय ताराचंद राठोड त्यांच्या १३ वी चा कार्यक्रम (उत्तरकार्य) मंगळवार, दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी राहते घर, मौजे पारडी (ता. मेहकर) येथे आयोजित करण्यात आला आहे.

आकाश कंदिलांतून एनसीसी विद्यार्थ्यांनी दिला जलसंवर्धनाचा संदेश!

'पाणी वाचवा, भविष्य घडवा' संकल्पनेवर आधारित स्पर्धेत ८३ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ फुलचंद भगत

वाशिम : महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने जिल्ह्यात जलसंवर्धनाबाबत विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. २१ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत जलसंधारण अभियान राबविण्यात येत असून, जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, मृदसंवर्धन आणि पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन याबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानाला हातभार लावत श्री बाकलीवाल विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयातील एनसीसी अधिकारी अमोल काळे यांच्या पुढाकाराने 'आजचे जलसंवर्धन उपाय व पाणी बचत' या विषयावर आकाश कंदील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत ८३ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागदांचा वापर करून आकर्षक आकाश कंदील तयार केले. त्यातून पाणी बचत, मृदसंवर्धन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण यांसारख्या विषयांवर प्रभावी संदेश दिले. 'आजचे संवर्धन, उद्याचे सुरक्षित भविष्य' आणि 'पाणी वाचवा, भविष्य घडवा' या घोषवाक्यांतून विद्यार्थ्यांनी जल आणि मृदसंपत्तीचे महत्त्व पटवून दिले. या उपक्रमाला मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकाश कंदिलांची पाहणी केली. जलसंधारण अधिकारी संकेत इंगोले, जलसंधारण अधिकारी रवि भालेराव, लेखापरीक्षक मिलिंद सावदेकर आणि वरिष्ठ लिपिक अतुल करमनकर यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. तसेच जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचा योग्य वापर आणि पर्यावरण रक्षण याविषयी मार्गदर्शन केले.पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरविणे, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे, वृक्षारोपणाला प्रोत्साहन देणे आणि मातीची धूप रोखणे यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे ही शासन आणि प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कलाकृतींतून दिला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये पाणी बचत आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाल्यास भविष्यात जबाबदार नागरिकांची पिढी घडण्यास मदत होईल.या उपक्रमातील सहभागी विद्यार्थी आणि एनसीसी कॅडेट्सचे बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सुरेंद्रकुमार बाकलीवाल, मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दांभिवाल, पर्यवेक्षक किशोर राठोड तसेच एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी अभिनंदन करून कौतुक केले.



सामूहिक प्रयत्नांना यश, अखेर शेतीसाठी पेनटाकळीच्या पाण्याचा पैनगंगा नदीत विसर्ग सुरु

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन





मेहकर : केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा पाठपुरावा, माजी आमदार संजय रायमुलकर यांचे उपोषण,आ. खरात यांचा पेनटाकळी प्रकल्पावर मोर्चा अशा सामूहिक प्रयत्नातून अखेर आज सायंकाळी पेनटाकळी प्रकल्पातून एक गेट १० सेंटीमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. खरिपाची पिके वाचवण्यासाठी शेतकरी मेटाकुटीला आला असताना खूप मोठा दिलासा यामुळे मिळाला आहे.

पेनटाकळी मध्यम प्रकल्पामध्ये चार दशलक्ष घनमीटर पाणी शासकीय संरक्षित पाण्यासाठी पैकी शिल्लक असल्याने ते खरिपाच्या तूर,हळद, कपाशी पिकांसाठी सोडण्यात यावे, यासाठी केंद्रीय आयुष आरोग्य,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनेक बैठका केले. आमदार सिद्धार्थ खरात यासाठी जिल्हाधिकारी यांच्या दालनात घेण्यात आल्या. ४ नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्यात येणार होते परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे ते सोडण्यात आले नाही. प्रतापराव जाधव यांनी पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्याशी आज संपर्क साधून सविस्तर चर्चा केली आणि पाणी सोडण्याचा निर्णय झाला. प्रकल्पातून पाणी सोडण्यात यावे यासाठी माजी आमदार संजय रायमुलकर यांनी बेमुदत उपोषण यांनीही पेनटाकळी प्रकल्पावर मोर्चा काढला. अखेर सर्वांच्या सामूहिक प्रयत्नाला यश आले असून आज सायंकाळी पेनटाकळी प्रकल्प येथे विधिवत नारळ फोडून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्फत एक गेट दहा सेंटिमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तीन दिवस पाणी सोडणे सुरू राहणार असून त्यातून पैनगंगा नदीवर असलेले बारा कोल्हापुरी बंधारे पूर्णपणे पाण्याने भरून राहणार आहेत. हे पाणी जवळपास दोन महिने शेतकऱ्यांना पिकांसाठी उपयोगी पडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आता आनंद फुलला आहे. किमान १४ गावांच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना या पाण्याचा लाभ होणार आहे. रब्बीची पिके घेऊ नयेत त्या ऐवजी चाऱ्याचे बी शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे ते शेतकऱ्यांनी पेरावे तो चारा शासन हमीभावाने विकत घेणार आहे, असे आवाहन प्रतापराव जाधव यांनी केले आहे. पाणी वापर महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र गाडेकर यांनी याबद्दल शासनाचे आभार मानले आहेत. यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, राष्ट्रवादीचे गिरीधर ठाकरे पाटील, आमदार सिद्धार्थ खरात, चिखलीचे नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, अंकुशराव पडघन, एकनाथ सास्ते, सिद्धेश्वर पवार, विलास रहाटे, ब्रह्मचारी धोंडगे, संजय वडतकर आशिष रहाटे यांच्यासह शिवसेना शिंदे पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अवैध सावकारीविरोधात बुलढाण्यात कारवाई; महत्त्वाची कागदपत्रे जप्त

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन



बुलढाणा : महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अंतर्गत बुलढाणा येथे अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने धडक कारवाई केली. सुंदरखेड परिसरातील एका गैरअर्जदाराविरुद्ध प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी पथकाने झडतीची कारवाई केली.

सुंदरखेड येथील सम्यक नगर परिसरातील सौ. दीक्षा शशिकांत गवई यांनी मौळी पार्क, खामगाव रोड, सुंदरखेड येथील रेखा मनोज पवार यांच्याविरुद्ध अवैध सावकारीची तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा डॉ. महेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नियुक्त करण्यात आले होते. या पथकाचे नेतृत्व सहायक निबंधक (प्रशासन) स्वरूपा धुमाळ यांनी केले. पथकात सहकार अधिकारी यु. के. सुरडकर, योगेश धुसळकर, के. डी. शोलके, ए. ए. बारी, निलेश सोनुने आणि अक्षय परिहार यांचा समावेश होता.

कारवाईदरम्यान पथकाने झडती घेऊन कोरे चेक, पैशांच्या व्यवहारासंबंधीचे करारनामे, व्यवहारांच्या नोंदवह्या तसेच अवैध सावकारीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या दस्तऐवजांची तपासणी सुरू आहे. ही कारवाई जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहकार विभागाचे अधिकारी व कर्मचारी, बुलढाणा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी तसेच बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अवैध सावकारीविरोधात निर्भयपणे तक्रार करा : या कारवाईनंतर जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी नागरिकांना आवाहन केले की, जिल्ह्यात कुठेही अवैध सावकारीचा प्रकार आढळल्यास नागरिकांनी न घाबरता सहकार विभागाकडे लेखी तक्रार दाखल करावी.

● पाणी मिळेपर्यंत टॉवर आंदोलन

आ. सिद्धार्थ खरात आणि समर्थकांच्या मध्यस्थीनंतर उकळीतील आंदोलन यशस्वी

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन





मेहकर : मेहकर तालुक्यातील उकळी शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी आणि अन्यायाविरुद्ध छातीठोकपणे लढणारे 'आंदोलन सम्राट' गजानन भाऊ बोरकर यांनी आज उकळी येथे सकाळी ५ वाजेपासून पाण्यापासून वंचित असलेल्या भागाला तात्काळ पाणी सोडण्याच्या मागणीसाठी उच्चदाब टॉवरवर चढून शोले स्टाईल तीव्र आंदोलन छेडले. पाणी प्रत्यक्ष सुरू झाल्याशिवाय खाली उतरणार नाही, असा ठाम पवित्रा त्यांनी घेतल्याने प्रशासनाची चांगलीच पळापळ झाली.

सकाळी आंदोलन सुरू होताच नायब तहसीलदार बोरकर आणि पेनटाकळी प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन गजानन भाऊंना खाली उतरण्याची विनंती केली. मात्र, शेतकरी हित सर्वोतोपरी मानणाऱ्या गजानन भाऊंनी प्रशासनाची विनवणी फेटाळून लावत थेट कारवाईची मागणी लावून धरली. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आमदार सिद्धार्थ खरात यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांनी गजानन भाऊंना खाली उतरण्याचे आवाहन करत तात्काळ बुलढाणा पाटबंधारे विभागाच्या मुख्य अभियंत्यांशी संपर्क साधला. अधिकाऱ्यांनी सायंकाळी ७ वाजेपर्यंत पाणी सोडण्याचे आश्वासन दिले. परंतु, "ना सत्तेचा मोह, ना खुर्चीची आस... शेतकऱ्यांच्या न्यायासाठी कायम संघर्षाची ध्यास!" या आपल्या बाण्याला जागत, "जोपर्यंत प्रत्यक्ष पाणी सुटत नाही, तोपर्यंत मी खाली येणार नाही," असा खंबीर निर्धार गजानन भाऊंनी व्यक्त केला. त्यांच्या या आंदोलनाला गिरीधर पाटील यांनीही खंबीर पाठिंबा दिला. अखेर गजानन बोरकर यांच्या तीव्र आणि आक्रमक पवित्र्यापुढे प्रशासनाला झुकावे लागले आणि रात्री जलशयनातून पाणी सोडण्यात आले. पाणी सुटल्याची खात्री पटल्यानंतरच गजानन टॉवरवरून खाली उतरले. पाणी सुटताच उपस्थित शेतकऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. आमदार सिद्धार्थ खरात आणि गिरीधर पाटील यांच्या हस्ते गजानन बोरकर यांचा फटाक्यांची आतिषबाजी करत आणि हार घालून सत्कार करण्यात आला. शेतकऱ्याच्या घामाला न्याय मिळवून देण्यासाठी थेट जीवावर उदार होऊन लढा देणाऱ्या गजानन भाऊ बोरकर यांच्या या यशस्वी आंदोलनाचे आणि संघर्षाचे सर्वत्र कौतुक होत असून परिसरभर त्यांच्या या धाडसी आंदोलनाचीच चर्चा रंगली आहे.

पार्डा येथे महिलांचा आक्रमक पवित्रा; अवैध दारू विक्रेत्यांवर टाकली धाड !

दारू जप्त करून प्रशासनाला विचारला जाब : भाजपा तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील, घटनास्थळी धाव







◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

मेहकर : तालुक्यातील पार्डा येथे उघडपणे सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात गावातील महिलांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने, अखेर संतप्त महिलांनी स्वतः पुढाकार घेत अवैध दारू विक्रीच्या ठिकाणावर थेट धाड टाकली. या धाडीदरम्यान महिलांनी मोठ्या प्रमाणावर अवैध दारू पकडून जप्त केली. महिलांच्या या धाडसी पावलामुळे अवैध दारू व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

निवेदनानंतरही दुर्लक्ष झाल्याने पाऊल : पार्डा गावात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री होत असल्यामुळे गावातील सामाजिक शांतता धोक्यात आली होती. या अवैध धंद्यांमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याने, महिलांनी एकत्र येत यापूर्वीच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. अवैध दारू विक्री त्वरित बंद करावी, अशी जोरदार मागणी महिलांनी निवेदनाद्वारे केली होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही अपेक्षित अथवा कठोर कारवाई झाली नाही. प्रशासकीय अनास्थेला कंटाळून अखेर आज महिलांनी स्वतः मैदानावर उतरून धाड टाकण्याचा निर्णय घेतला...

प्रतिनिधी आणि सरपंचांची घटनास्थळी धाव : महिलांनी अवैध दारू पकडल्याची बातमी गावात वाऱ्यासारखी पसरताच परिसरात मोठी खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील, सर्वेश पाटील तसेच पार्डा गावचे सरपंच गजानन क्षीरसागर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारीही उपस्थित झाले होते...

प्रशासनाला विचारला जाब : घटनास्थळी उपस्थित भाजपा तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील, सरपंच गजानन क्षीरसागर आणि संतप्त ग्रामस्थांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना चांगलाच जाब विचारला. "गावातील महिलांना स्वतः रस्त्यावर उतरून दारू पकडावी लागत असेल, तर प्रशासन काय करत आहे?" असा सवाल उपस्थित करत उपस्थितांनी अवैध दारू विक्री पूर्णपणे बंद करण्याची आणि दोषींवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली.

परिसरात महिलांच्या धैर्याची चर्चा : या आंदोलनात पार्डा गावातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अवैध दारूचा सुळसुळाट मोडून काढण्यासाठी महिलांनी दाखवलेल्या या धाडसाचे आणि पुढाकाराचे संपूर्ण मेहकर तालुक्यात कौतुक होत असून, सध्या या घटनेची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. प्रशासनाने आता तरी जागे होऊन कायमस्वरूपी कारवाई करावी, अशी मागणी गावकऱ्यांमधून केली जात आहे.

१९ वर्षांपासून रामरोटी आश्रमाचा अखंड सेवायज्ञ ! वंचित मनोरुग्ण बांधवांसोबत दिवाळीचा आनंद

मायेचा फराळ अन् जीवनावश्यक साहित्याचे वाटप

◆ दै. दिव्य मातृछाया
◆ अतिक खान



मुक्ताईनगर : 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' हा उदात्त विचार प्रत्यक्ष कृतीतून जपत प.पू. गुरुवर्य संत रामभाऊ पुजारी बाबा सेवाभावी ट्रस्ट अंतर्गत कार्यरत असलेल्या रामरोटी आश्रमाने आपल्या १९ वर्षांच्या अखंड सेवाकार्याची परंपरा यंदाही कायम ठेवली. दिवाळीच्या सणानिमित्त समाजातील वंचित आणि निराधार घटकांच्याही जीवनात आनंदाचा प्रकाश पसरावा, या भावनेतून आश्रमाच्या वतीने बोदवड येथील आत्मसम्मान फाउंडेशनमध्ये उपचार घेत असलेल्या मनोरुग्ण बांधवांसाठी दिवाळी फराळासह जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

गेल्या ११ वर्षांपासून आत्मसम्मान फाउंडेशन निराधार मनोरुग्ण बांधवांच्या संगोपन व उपचाराचे कार्य करीत आहे. या संस्थेतील बांधवांनाही दिवाळीचा आनंद अनुभवता यावा, त्यांना आपलेपणाची आणि कुटुंबाच्या मायेची जाणीव व्हावी या उद्देशाने रामरोटी आश्रमाने हा कौटुंबिक स्वरूपाचा सामाजिक उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत मनोरुग्ण बांधवांना नमकीन चिवडा, सोनपापडी यांसारख्या दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच गहू, तांदूळ, साखर, तेल, तूप, रवा, मैदा, खोबरे, चहापत्ती, बेसन पीठ, तूर डाळ, चणा डाळ, उडीद डाळ, मूग डाळ, सोयाबीन वडी, पोहे, जिरे, मोहरी, शेंगदाणे, धने, हळद, मिरची पावडर, मीठ व मसाले यांसह संपूर्ण किराणा साहित्य देण्यात आले. याशिवाय बिस्किटांचे पुडे, कपडे, निरमा पावडर, पॅराशूट तेल आणि आंघोळीच्या साबणाचेही वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, हा उपक्रम केवळ साहित्यवाटपापुरता मर्यादित नसून समाजातील दुर्लक्षित घटकांनाही सन्मानाने जगण्याचा आणि सणांचा आनंद घेण्याचा अधिकार आहे, हा मानवतेचा संदेश देणारा ठरला. या सेवाकार्यासाठी डॉ. एन. जी. मराठे (ज्येष्ठ हृदयरोगतज्ज्ञ, गायत्री हॉस्पिटल), पोलीस निरीक्षक आशिष आडसूळ व मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे कर्मचारी वृंद, अजय प्रल्हाद खैरनार (असिस्टंट डायरेक्टर तथा प्राधिकृत अधिकारी, एफएसआय, मुंद्रा पोर्ट, गुजरात), पुरुषोत्तमभाऊ वंजारी, हकिमभाऊ आर. चौधरी (राम रहीम चेंबर), संदीपभाऊ खरे (गणेश झेरॉक्स), जगदीशभाऊ निकम (सायी डेअरी), डॉ. गणेश माधव येवले (नाशिक), प्रदीपभाऊ चौधरी (बँक अधिकारी), अनिरुद्ध गोपाळ महाजन (ठाणे), मनोजभाऊ भुजंगराव देशमुख (हरताळा), प्रदीपभाऊ पुंडलिक निळे (अप्पा) आणि सुनीलभाऊ नागोराव देशमुख (गुरुजी) यांनी मोलाचे सहकार्य केले. या सर्व दानशूर व्यक्तींच्या आर्थिक व वस्तुरूप सहकार्यामुळे रामरोटी आश्रमाचा हा सेवाभावी उपक्रम यशस्वीपणे पार पडला. आश्रमाच्या सेवक परिवाराने सर्व दात्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. 'एक हाताने केलेले दान हजारो हातांनी परत येते' या भावनेतून सुरू असलेला रामरोटी आश्रमाचा हा १९ वर्षांचा निस्वार्थ सेवायज्ञ समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

धनत्रयोदशीनिमित्त केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे सपत्नीक भगवान धन्वंतरी पूजन

आरोग्य संवर्धन, निरोगी जीवनशैली आणि भारतीय पारंपरिक वैद्यकीय ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित





◆ दै. दिव्य मातृछाया
◆ वृत्तसंकलन

बुलढाणा : धनत्रयोदशीच्या पावन पर्वानिमित्त केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक भगवान धन्वंतरी यांचे विधिवत पूजन करून आरोग्य आणि निरोगी जीवनासाठी प्रार्थना केली.

भारतीय संस्कृतीमध्ये धनत्रयोदशीला विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. या दिवशी आरोग्याचे अधिष्ठाता मानले जाणारे भगवान धन्वंतरी यांचे पूजन करण्याची परंपरा आहे. आयुर्वेदाचे जनक आणि आरोग्याचे देवता म्हणून भगवान धन्वंतरी यांना मानले जाते. त्यांच्या पूजनातून निरोगी जीवन, आरोग्य संवर्धन आणि दीर्घायुष्याचा संदेश दिला जातो.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भगवान धन्वंतरी यांचे पूजन करून सर्वांच्या उत्तम आरोग्यासाठी मंगलकामना व्यक्त केल्या. धनत्रयोदशीच्या निमित्ताने भगवान धन्वंतरीचे पूजन ही केवळ धार्मिक परंपरा नसून, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणारी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणारी संधी आहे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करावा, आरोग्याची काळजी घ्यावी आणि भारतीय पारंपरिक वैद्यकीय ज्ञानाचे महत्त्व जाणून घ्यावे, असा संदेश या पूजनाच्या निमित्ताने अधोरेखित झाला.